तात्काळ

नुतनीकरणाने

जा.क्र. माध्य. ३ ( १४) /नमाशा/मान्यता/
पुवि / २००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.

दिनांक / /
-4 MAY 2002

प्रति,

सचिव, श्री. संत तुकाराम शिक्षण संस्था,
चंदननगर, जि. पुणे.

विषय - सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ - शासन पत्र क्रमांक : नमाशा- १००१/[५३७/ २००१]माशि-१, दिनांक ३०. ८. २००१

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून २००१........ पासून विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) शासनाने विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालण करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देगणी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये

७) माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

इतर अटी -

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्‍वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्‍वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) सदर परवानगी दिलेल्या शाळेच्या संस्थेविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. संत तुकाराम शिक्षण संस्था, चंदननगर जि. पुणे | वाडे बोल्हाई ता. हवेली जि. पुणे. | आठवी | मराठी |

[जून- २००१ पासून इ.८ वी मराठी]

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, १ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १ करिता.

प्रतिलिपी -

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुणे करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थांविरुद्ध तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्य. शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - २ यांना सविनय सादर.